N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0092 **Year (वर्ष):** 2026

Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ): 03/02/2026 22:55

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८	7A

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिंनाक पासून):** 02/02/2026

Time Period (कालावधी): **Date To (दिंनाक पर्यंत):** 03/02/2026

Time From (वेळेपासून): 16:42 बजे

Time To (वेळेपर्यंत): 13:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

Date (दिंनाक): 03/02/2026 **Time (वेळ):** 22:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**

Entry No. (नोंद क्र.): 068

Date & Time (दिंनाक आणि वेळ): 03/02/2026 22:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हाधिकारी कार्यालय ,कोल्हापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्धीबाहेर असल्यास):**

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): उज्वला मारूती भडकमकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,कोल्हापूर ,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,कोल्हापूर ,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-8446153029

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	विनोद कष्णात बामणकर			1. कोगील बुद्रुक, ता करवीर,, जिकोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	500/ रूपये दराच्या 02 भारतीय चलनी नोटा	1,000.00

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):
1,000.00

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

फिर्याद दिंनाक - 03/02/2026

मी उज्वला मारूती भडकमकर वय 39 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8446153029 समक्ष शाहुपूरी पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

दिंनाक 02/02/2026 रोजी मी ला.प्र.वि.कोल्हापूर कार्यालयात उपस्थित असताना मला पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांनी 13.45 वाजता त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन कळविले की, समोर उपस्थित तक्रारदार प्रविण रघूनाथ बोराटे वय 25 वर्षे ,व्यवसाय खाजगी नोकरी, रा.व्हन्नुर ता.कागल जि.कोल्हापूर मो.नं. 7558254643 हे असुन त्यांची लाच मागणीबाबत तक्रार असुन तुम्ही तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेणेस व पुढील कारवाई करणेबाबतचा आम्हास मुखशील आदेश दिला. त्यावेळी आम्ही तक्रारदार बोराटे यांना त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी तक्रारीची हकिकत सांगितली की, मी वरील पत्यावर राहणेस असुन माझे आजोबा बाळू कृष्णा बोराटे यांचे नांवे कोगिल बुद्रुक ता.करवीर येथे गट नं. 531 क्षेत्र 7 गुंठे ही शेतजमीन आहे.सदर शेतजमीन तारण देवून माझे आजोबा बाळू बोराटे यांनी हनुमान विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादीत,व्हन्नुर ता.कागल या संस्थेकडून तीन महिन्यापुर्वी 5,00,000/- रूपये कर्जाची मागणी केली होती.त्यावेळी आंम्हाला संस्थेकडून कर्ज मंजूर झाले होते.परंतु सदर कर्जाची रक्कम आंम्हाला देण्यापुर्वी संस्थेचा नियमानुसार आंम्ही तारण म्हणून दिलेल्या वरील मिळकतीचे 7/12 उता-यावर संस्थेने बोजा नोंद केला होता. मी गेले एक वर्षापुर्वी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या. समाजल्याण कार्यालय,कोल्हापूर येथून माझे नांवे गोठा प्रकल्प व्यवसाय वाढीकरीता 3,00,000/- रूपये कर्ज मिळण्याकरीता फाईल दाखल केली होती. त्यानुसार मला डिसेंबर 2025 मध्ये वसंतराव नाईक महामंडळाकडून कर्ज मंजूर झालेने माझे आजोबा बाळू बोरोटे यांनी श्री हनुमान विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादीत,व्हन्नुर ता.कागल या संस्थेकडून मागणी केलेल्या कर्जाची रक्कम 5,00,000 रू.ही न घेण्याचे ठरविले होते.परंतु तत्पुर्वी माझे आजोबा बाळू बोराटे यांचे मालकीचे कोगिल बुद्रुक ता.करवीर येथे गट नं. 531 या मिळकतीवर बोजा नोंद झाला होता. सदरचा बोजा कमी करण्याकरीता श्री हनुमान विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादीत,व्हन्नुर ता.कागल यांनी महसुल अधिकारी, कोगिल बुद्रुक ता.करवीर यांचे नांवे पत्र दिले होते.सदरचे पत्र मी स्वतः महसुल अधिकारी यांचे कार्यालयामध्ये दिंनाक 23/01/2026 रोजी जमा करण्याकरीता गेलो होतो. त्यावेळी तेथे मला कोतवाल विनोद बामणकर हे भेटले. त्यावेळी मी त्यांचेकडे संस्थेच पत्र दिले व आजोबांचे नांवे असलेल्या मिळकतीवरील बोजा कमी करणेचा असल्याचे सांगितले.त्यावेळी कोतवाल बामणकर यांनी बोजा कमी करण्यासाठी 1000/-खर्च आहे तो आणून दया त्यानंतर 7/12 उता-यावरील बोजा कमी करून देतो असे सांगितले. त्यावेळी मी ठिक आहे असे म्हणून निघून आलो. कोतवाल विनोद बामणकर, कोगिल बुद्रुक ता.करवीर हे माझेकडे मागत असलेले 1,000/- रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे, परंतु कोतवाल विनोद बामणकर यांनी मागणी केलेले पैसे देण्याची माझी इच्छा नाही. मी कोतवाल विनोद बामणकर यांना आज दि.02/02/2026 रोजी भेटण्यास जाणार आहे. तरी त्यांचेवर कारवाई करावी म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर मी लागलीच मा. जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच यांना दिंनाक 02/02/2026 रोजी गोपनिय कामकाजाकरीता पाठवावे असे कळविले. त्याप्रमाणे दिंनाक 02/02/2026 रोजी सकाळी 14.50 वा चे सुमारास दोन शासकीय पंच 01) ऋषिकेश परूळेकर, आरोग्यसेवक, 02) राहुल डोंगळे, आरोग्यसेवक असे हजर झाले. त्यानंतर सापळा पथकातील अमंलदार यांना बोलावुन घेतले. आम्ही त्यावेळी तक्रारदार बोराटे यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार बोराटे यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर तक्रारदार बोराटे यांनी त्यांचा तक्रारी अर्ज आमचेकडे दिला. तक्रारदार बोराटे यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी

अर्जावर सहया केल्या. त्यावेळी तक्रारदार बोराटे यांनी पुढील कारवाई कंदलगाव, ता. करवीर गावचे हददीत कणेरीमठ ते गोकुळ शिरगाव जाणारे रोडलगत मोकळया जागेतुन करूया असे सांगुन तेथे येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन कार्यालयातुन शासकीय वाहन क्रमांक एम.एच.09 एफ व्ही 8547 यामध्ये बसलो. त्यानंतर आम्ही सर्वजण कार्यालयातुन शाहु नाका, कंदलगाव असे करून कंदलगावचे हददीत तक्रारदार यांनी सांगितले ठिकाणी आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार बोराटे हजर होते. त्यावेळी कारवाईचे अनुषंगाने पंच क्रमांक 1 म्हणुन ऋषिकेश परूळेकर व पंच क्रमांक 2 म्हणुन राहुल डोंगळे हे काम पाहतील असे सर्वामते ठरले. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार बोराटे व पंच नं.01 ऋषिकेश परूळेकर यांचेसह ग्रामपंचायत जवळ असले तलाठी कार्यालय कोगील बुद्रुक येथे कोतवाल विनोद बामणकर यांची भेट घेणेकरीता पाठवुन, तक्रारदार बोराटे यांचे तक्रारीप्रमाणे, त्यांचेकडे कोतवाल बामणकर हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन,पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून,रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार बोराटे व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 16.42 वाजता चालु करून, तो तक्रारदार बोराटे यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार बोराटे व पंच नं.1 ऋषिकेश परूळेकर यांना कोतवाल बामणकर यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार बोराटे यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 ई वाय 6228 वरून पाठविले. त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच नं.02 राहुल डोंगळे असे गाडीत थांबुन राहीलो. तक्रारदार पाटील व पंच नं.1 ऋषिकेश परूळेकर असे कोतवाल बामणकर यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 17.13 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 ऋषिकेश परूळेकर यांना कोतवाल बामणकर यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार पाटील यांचे सोबत ग्रामपंचायत कोगील बुद्रुक जवळ असले तलाठी कार्याजयाजवळ गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी तलाठी कार्यालयात जावुन कोतवाल बामणीकर हे आहे का पाहीले असता ते तेथे नव्हते म्हणुन त्यांनी बामणकर यांना दोन वेळा त्यांचे मो.नं. 7558254643 वरून बामणकर यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9021619138 वरती फोन लावला परंतु त्यांनी तक्रारदार यांचा फोन उचलला नाही. त्यानंतर तक्रारदार बोराटे व मी कोतवाल बामणकर यांचे घराजवळ जावुन पुन्हा दोन वेळा फोन लावला त्यांनी उचलला नाही त्यानंतर पुन्हा फोन लावला असता बामणकर यांनी फोन उचलला त्यावेळी त्यांनी ते कोल्हापूरात असलेचे त्यांनी सांगितले. त्यावेळी तक्रारदार बोराटे व कोतवाल बामणकर यांचेत तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी तक्रारदार बोराटे "ते नव्ह विनोद दा ते तुम्ही पैशाच एक हजार बोलला ना.." असे म्हणाले. त्यावेळी कोतवाल बामणकर "हां..." असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत पुन्हा कामाचे अनुषंगाने तसेच तलाठी साहेबांना भेटण्याचे तसेच संस्थेकडुन पत्रात चेंजस आणुन देण्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी त्यांचेत उदया सकाळी पावणे आठला येण्याचे व कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यानंतर मी व तक्रारदार बोराटे तेथुन निघुन आपले जवळ आलो आहे असे सांगितले. आम्ही तक्रारदार बोराटे यांना कोतवाल बामणकर यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 ऋषिकेश परूळेकर यांचे हकीकती प्रमाणे हकीकत सांगितली.

त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार बोराटे हे आमचेजवळ असताना कोतवाल बामणकर यांचा तक्रारदार यांना मिस कॉल आला. त्यावेळी तक्रारदार यांनी आमचे सुचनेवरून कोतवाल बामणकर यांना 17.35 वाजता फोन लावला त्यावेळी तक्रारदार यांनी साहेब कधी येतात असे विचारले त्यावेळी कोतवाल बामणकर यांनी साहेब पाहिजे हाईत तुला, रमनमळयात इलेक्शन डयुटी ला आहेत असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार साहेबांना भेटतो असे म्हणाले असता कोतवाल बामणकर यांनी "मला भेटणार हाईस काय सांग नाहीतर मला दुसरी काम करायला बर रे" असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार चालतय भेटतो की मग तुम्हाला असे म्हणाले त्यावेळी कोतवाल बामणकर यांनी साडेसातला ये मग फोन कर असे म्हणाले. सदरचा कॉल रेकॉर्ड केला आहे.

कोतवाल बामणकर यांनी तक्रारदार यांना साडेसात वाजेपर्यंत कोगील बुद्रुक येथे बोलाविले असल्याने कोतवाल बामणकर यांची पडताळणी कारवाई करणेकरीता व्हाईस रेकॉर्डर 19.23 वाजता चालु करून, तो तक्रारदार बोराटे यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार बोराटे व पंच नं.1 ऋषिकेश परूळेकर यांना कोतवाल बामणकर यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार बोराटे यांचे मोटर सायकल वरून पाठविले. त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच नं.02 राहुल डोंगळे असे गाडीत थांबुन राहीलो. तक्रारदार पाटील व पंच नं.1

ऋषिकेश परूळेकर असे कोतवाल बामणकर यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 19.52 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 ऋषिकेश परूळेकर यांना कोतवाल बामणकर यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे कोतवाल बामणकर यांचे घराजवळ गेलो त्यावेळी तक्रारदार बोराटे यांनी बामणकर यांना फोन करून ते आलेचे सांगितले त्यावेळी बामणकर यांनी दोन मिनट थांब आलो असे म्हणाले. त्यानंतर काहीवेळाने कोतवाल बामणकर तेथे आले. त्यावेळी तक्रारदार बोराटे व कोतवाल बामणकर यांचेत त्यांचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार बोराटे जरा साहेबांसनी जरा रिक्वेस्ट करतो जरा गाट घालुन दया असे म्हणाले. त्यावेळी बामणकर काय करायच हाय तुझ असे म्हणाले. त्यावेळी पुन्हा तक्रारदार यांनी जरा गाट घालुन रिक्वेस्ट करतो की त्यासनी असे म्हणाले. त्यावेळी कोतवाल बामणीकर नाही, तुझ घालतो म्हणुन सांगितलय नव्ह का असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी बामणकर घालतो म्हणुन सांगितलीया ना डायरी, काय.. असे म्हणाले. तयानंतर त्यांचेत बँकेच व कर्जाचे अनुषंगाने बोलने झाले. बामणकर हे तक्रारदार बोराटे यांना त्यांचे काम करून देतो या अनुषंगाने बोलले. त्यावेळी तक्रारदार " दहा वाजता येतो की मी" असे म्हणाले. त्यावेळी बामणकर "काय कराय" असे म्हणाले. त्यावेळी बोराटे "ते सांगितल्याल" असे म्हणाले. त्यावेळी बामणकर "पेमेंट" असे म्हणाले. त्यावेळी बोराटे "पेमंेट तुम्ही सांगितल्याल एक हजार" असे म्हणाले. त्यावेळी बामणकर "आता आणला नाहीस" असे म्हणाले. त्यावेळी बोराटे "नाही आता हुत खर, सकाळी आजीला जरा दवाखाण्यात घातल" असे म्हणाले. त्यावेळी बोराटे "मग उदया दहा साडेदहा वाजता येतो की" असे म्हणाले. त्यावेळी बामणकर "मला फोन कर आणि ये मग" असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत कामाचे तसेच ते कोल्हापूर ला जाणार आहेत या अनुषंगाने बोलने झाले त्यानंतर आम्ही मी व तक्रारदार बोराटे तेथुन निघुन आपले जवळ आलो आहे असे सांगितले. आम्ही तक्रारदार पाटील यांना कोतवाल बामणकर यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 ऋषिकेश परूळेकर यांचे हकीकतीस मिळतीजुळती हकीकत सांगितली.

तक्रारदार बोराटे हे तलाठी साहेब यांना भेटतो असे म्हणत असताना कोतवाल विनोद बामणकर हे तक्रारदार बोराटे यांना तलाठी साहेब यांना भेटण्यास जावु नका तसेच भेटु नका असे म्हणुन "मला भेटणार हाईस काय सांग नाहीतर मला दुसरी काम करायला बर रे" असे म्हणाले आहेत. यावरून ते तक्रारदार यांना तलाठी साहेब यांना भेटु देत नाहीत तसेच तलाठी यांचेकडुन काम ते स्वतः पुर्ण करून देतो असे तक्रारदार यांना सांगत आहेत. त्यावरून कोतवाल बामणकर हे तक्रारदार बोराटे यांचेकडे त्यांचे आजोबांचे नावे असले सातबारा पत्रकावरील बोजा कमी करून देण्यासाठी 1,000/- रूपये लाचेची मागणी केली असुन मागणी केलेली 1,000/- रूपये लाच रक्कम रोजी घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले परंतु तक्रारदार बोराटे यांनी कोतवाल बामणकर यांना उदया दहा साडेदहा वाजता येतो असे सांगितले असल्याने सापळा कारवाई दिंनाक 03/02/2026 रोजी करण्याचे सर्वामते ठरविले व चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिंनाक 03/02/2025 रोजी 11.15 वाजता आम्ही दोन्ही पंच तसेच सापळा पथक असे कंदलगावचे हददीत तक्रारदार यांनी सांगितले ठिकाणी आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार बोराटे हजर होते. आम्ही सापळा कारवाई सुरू केली. सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार बोराटे यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 02 चलनी नोटा अशी 1,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार बोराटे व पंचाना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार बोराटे व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर अॅथ्रासिन लावलेले 1,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे पाठीमागील बाजुचे डावे बाजुच्या खिशात ठेवले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना कोतवाल बामणकर यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचे उजव्या हाताने हाथ रूमाल तोंडावरून फिरवुन हातात ठेवायचा असा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना कोतवाल बामणकर यांचा आम्ही पोहचण्याच्या आधी फोन आला असुन सदरचा फोन त्यांनी उचलला नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यावेळी आमचे सुचनेवरून तक्रारदार बोराटे यांनी कोतवाल बामणकर यांना फोन केला त्यावेळी बामणकर यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर काहीवेळाने कोतवाल बामणकर यांचा तक्रारदार बोराटे यांना 11.51 वाजता फोन आला त्यावेळी बामणकर यांनी त्यांना ते कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे ईलेक्शन डयुटी करीता आले असुन कोल्हापूरात या असे सांगितले. सदरचा कॉल रेकॉर्ड केला आहे.

त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई कोल्हापूर शहरातील खानविलकर पेट्रोल पंपाजवळील मोकळया जागेतुन करण्याचे आहे असे सांगुन आम्ही सर्वजण तेथुन निघुन खानविलकर पेट्रोल पंपाजवळ मोकळया जागेत

आलो. त्यावेळी आम्ही तक्रारदार बोराटे, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 12.50 वाजता सुरू करून, तो तक्रारदार बोराटे यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार बोराटे व पंच नं.1 ऋषिकेश परूळेकर असे त्यांचे मोटर सायकलने आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूरकडे निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 राहुल डोंगळे असे आमचेकडील चारचाकी वाहनातुन तक्रारदार यांचे पाठोपाठ जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आलो. त्यावेळी तक्रारदार बोराटे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचे बाहेर एका चहाचे टपरी जवळ थांबुन फोन लावल्याचे दिसले. त्यावेळी आम्ही त्या परीसरामध्ये आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. काहीवेळाने बामणकर हे तक्रारदार यांचेजवळ आला. त्यावेळी त्यांचेत बोलने चालल्याचे आम्ही पाहीले. त्यानंतर तक्रारदार बोराटे यांनी कोतवाल बामणकर यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 राहुल डोंगळे व स्टाफ तेथे गेलो. तक्रारदार बोराटे यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 13.04 वाजता बंद करून, तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह कोतवाल बामणकर यांना पकडले. त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आलेनंतर तक्रारदार यांनी ते कार्यालयाजवळ चहाचे टपरीजवळ आलेबाबत कोतवाल विनोद बामणकर यांना सांगितले. त्यानंतर काहीवेळाने बामणकर तेथे आले त्यावेळी त्यांचेत त्यांचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार बोराटे "आता तुम्ही तेवढ बोलुण, हे करा.." असे म्हणाले. त्यावेळी बामणकर "दर मंगळवारी हित डयुटी आसतीया रे माझी..." असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार बोराटे "हां.. हां.." असे म्हणाले. त्यावेळी कोतवाल बामणकर "तारखेला.. साहेबाला सांगतो फोन करतो" असे म्हणुन तक्रारदार यांना हाताचे अंगठयाने पैश्याबाबत इशारा केला. त्यावेळी तक्रारदार "करा की आणि जरा बोलुण बघा तुम्ही..." असे म्हणुन तक्रारदार यांनी त्यांचे डावे हाताने पैसे कोतवाल बामणकर यांचे समोर धरले त्यावेळी बामणकर यांनी ते पैसे त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार बोराटे यांनी कोतवाल बामणकर यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून पंचाचे समक्ष कोतवाल विनोद बामणकर यांचेकडुन लाच रक्कम हस्तगत केली. सदर ठिकाणचे व्हिडीओ शुटींग केले आहे. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालय येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार प्रविण रघूनाथ बोराटे यांचे आजोबा बाळु कृष्णा बोराटे यांचे नांवे कोगिल बुद्रुक ता. करवीर येथे गट नं. 531 क्षेत्र 7 गुंठे ही शेतजमीन आहे. त्यांचे आजोबांनी सदर शेतजमीन तारण देवून गावातील सहकारी संस्थेकडुन कर्ज मंजूर झाले होते. सदर कर्जाची तारण म्हणून दिलेल्या वरील मिळकतीचे 7/12 उता-यावर संस्थेने बोजा नोंद केला होता. कोतवाल बामणकर यांनी तक्रारदार बोराटे यांना तक्रारदार यांचे 7/12 उता-यावरील संस्थेचा बोजा तलाठी कोगील बुद्रुक यांचेकडुन कमी करण्याचे काम ते स्वतः करून देतो असे तक्रारदार प्रविण बोराटे यांना सांगुन त्याकरीता त्यांचेकडे 1,000/- रूपये लाचेची बेकायदेशिरपणे मागणी करून मागणी केलेली 1,000/- रूपये लाच रक्क्म तक्रारदार बोराटे यांचेकडुन, बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी विनोद कृष्णात बामणकर, वय- 29 वर्षे, महसुल सेवक (कोतवाल) सजा कोगील बुद्रुक, रा. कोगील बुद्रुक, ता. करवीर, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाण, संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

santosh gundopant doke(I (Inspector)) / SGDM7903 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

umbhadkar

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
शाहपूरी पोलीस ठाणे

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): santosh gundopant
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): SGDM7903